प्रचंड खपाचे नि:पक्ष, निर्भीड दैनिक

# पुढारी

पुणे, मुंबई, अहमदनगर, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, बेळगाव व पणजी येथून एकाचवेळी प्रसिद्ध

पुणे

स्थापना वर्ष ७२ ■ पुणे आवृत्ती वर्ष ४ ■ मंगळवार, २ नोव्हेंबर २०१० ■ पाने २० (१२+८) ■ किंमत ₹ २.००

## झाले मोकळे आकाश






नुकतेच माझे बाबा, सोमनाथनगर येथील डॉ. पवारांच्या इस्पितळात ॲडमिट होते. टायफॉईडचे निदान झाले होते. डॉ. सुभाष पवार (दापंत्य) हे माझे मित्रच असल्यामुळे ते बाबांची घरच्यांसारखी काळजी घेत होते. बाबांना भेटण्यासाठी इस्पितळात गेलो. तिथे जवळच राहणाऱ्या कुलकर्णी काकूंशी बाबांनी ओळख करून दिली. बाबांना भेटायलाच त्या आल्या होत्या. ओळख करून दिल्यानंतर काकू मला म्हणाल्या, सर बऱ्याच दिवसांपासून तुम्हाला भेटावं म्हणते, पण योगच येत नव्हता, पेपरमध्ये तुमच्या व्याख्यानाच्या बातम्या व लेख आवर्जुन वाचत असते. सर पाच मिनिटे का होईना आमच्या घरी चला ना. मला फार बरे वाटेल. काकूंच्या आग्रहाने घरी पोहोचलो. घरी गेल्या गेल्या काकूंनी प्रथम एक वयोवृद्ध आजोबांशी माझी ओळख करून दिली. त्या म्हणाल्या, सर हे डॉ. कौल (नाव बदलले आहे.) आमच्याकडे पेईंगगेस्ट म्हणून राहतात. ते नेत्रहीन आहेत. काकू त्यांना म्हणाल्या, आजोबा हे योगशिक्षक दत्ता कोहिनकर. हे ध्यानधारणा, निरोगी शरीर, मन: शांती, यासारख्या विषयांवर व्याख्यान देतात. पेपरला नेहमी यांचे लेख असतात. हे ऐकताक्षणी आजोबा (डॉ. कौल) यांनी माझा हात हातात घेण्यासाठी स्वत:चा हात पुढे केला. मी हात मिळविल्यानंतर त्यांनी माझ्या खांद्यावर हात ठेवून मला शेजारी बसावयास सांगितलं व ते म्हणाले, सर, मी मूळचा काश्मिरी पंडित आता माझे वय ८३ वर्षे आहे. मी फार ताणतणावात आहे. मला नैराश्यानं ग्रासलय, नीट झोपही येत नाही. प्रचंड अस्वस्थता, बैचेनी अगदी जीवनच संपवावं अस वाटतं. सर मला मन:शांतीसाठी एखादा उपाय सांगाला का, ३० वर्षांपूर्वी अंधत्व आलं, मन मोकळ करावं असं जवळ कोणीही नसतं. एक काळ अत्यंत प्रतिष्ठेचा व ऐश्वर्याचा काढला, आता हे सगळ असह्य झालाय हो, तेव्हा मी म्हटलं, आजोबा मी तुमच्या मुलासारखा, मला या तुमच्या ताणतणावाचे मूळ कारणही कळू द्या, मग त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग ही तुम्हाला सांगतो. तेव्हा डॉ. कौल म्हणाले, पुण्यात डेक्कनला मी आई-वडिलांसोबत भाड्याने राहत होतो. मला दोन भाऊ-दोन बहिणी. वयाच्या १५ व्या वर्षीच वडिलांचे निधन झाले. मी घरात मोठा असल्यामुळे सगळी जबाबदारी माझ्यावरच पडली. काम करता - करता शिक्षण घेतले. बी.ई. सिव्हील नंतर एमएमबीएस व एमबीबीएस झालो. लष्करात १५ वर्षे सिव्हील इंजिनिअर व तद्नंतर जगविख्यात हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनीत महाव्यवस्थापक म्हणून काम केले.

घरच्या भावा - बहिणींचे शिक्षण - घर चालवण्याची जबाबदारी, त्यांची लग्नं, या सर्व गोष्टी पार पाडता - पाडता माझ्या वयाची ४८ वर्षे पूर्ण झाली. सर्वांची देखभाल करता करता एक - एक जबाबदाऱ्या पार पाडता-पाडता वयाच्या ४८ वर्षांपर्यंत लग्न करावयाचे राहून गेले. नातेवाइकांनी म्हातारपणाला आधार म्हणून आता - तरी लग्न कर असा तगादा लावला. शेवटी ४८ व्या वर्षी घटस्फोट घेतलेल्या ३० वर्षांच्या महिलेसोबत विवाहबद्ध झालो. तिला एक मुलगीही होती. तद्नंतर मलाही एक मुलगी झाली. मुलींच शिक्षण व बायकोचा उत्तम सांभाळ करत असताना वयाच्या ५३ व्या वर्षी माझी दृष्टी गेली. तोपर्यंत पत्नीला महानगरपालिकेत नोकरी मिळाली होती. महानगरपालिकेच्या सोसायटीत नेमका लकी ड्रॉमध्ये तिचा नंबर लागला. ती जागा घेण्यासाठी मी सर्व पैसे दिले. बांधकाम केले; परंतु तद्नंतर माझ्या अंधत्वामुळे पत्नी माझी अवहेलना करून -शिवीगाळ करून सर्व पैसा (पी.पी.एफ, गॅच्युईटी) मागू लागली. मी हे करण्यास नकार दर्शवताच तिने बऱ्याच वेळा मला मारहाण, दमदाटी, उपाशी ठेवणे अशा प्रकारची दडपशाही सुरू केली. वडगावशेरी येथील एक प्रॉपर्टी माझ्या सिंगापूरच्या भावाने मला दिली होती, तीही ती नावावर करून मागू लागली व मला खुपदा घराबाहेर काढून - मारहाण केली. खूप आशेने माझ्या मुलीला मी हे कळविल्यानंतर ती मला मुंबईला घेऊन गेली. परंतु काही दिवसांनंतर जावयाने सुद्धा १० लाख रु. द्या नाहीतर - निघून जा, अशी धमकीच भरली व माझा मानसिक छळ सुरू केला. बायको - व जावई दोघेही माझी सर्व मालमत्ता हडपवून मला कायमस्वरूपी संपवण्याचा प्रयत्नात दिसताच एक दिवस मी घर सोडले व आमच्या ३० वर्षांपूर्वीच्या घराजवळ राहणाऱ्या कुलकर्णी बाईंचा पत्ता शोधून त्यांच्या घरी गेलो व त्यांना सर्व वृत्तांत सांगितला. तेव्हा त्यांनी मला त्यांच्याकडे पेईंगगेस्ट म्हणून राहण्याची मुभा दिली. तेव्हापासून मी येथे राहत आहे, पण या सगळ्या गोष्टींचा माझ्या मनावर फार गंभीर परिणाम होऊन मी या विषारी चक्रव्यूहात अडकून मला प्रचंड नैराश्य आल्यामुळे जीवनच नकोसे झाले आहे. साहेब हात जोडतो मला मदत करा. वारंवार आत्महत्येचे विचारच मनात येत आहेत. त्यांचे सर्व ऐकून घेतल्यानंतर मी त्यांना म्हणालो, आजोबा तुम्हाला या ताणतणावातून, निराशेतून बाहेर काढून मनाची सबलता व निर्मलता वाढवण्यासाठी ध्यान शिकावं लागेल, त्यासाठी १० दिवसांच्या विपश्यनेच्या निवासी शिबिरात तुम्हाला सहभागी व्हावं लागेल. एवढ म्हणतो न म्हणतो तोच आजोबा मला म्हणाले, मित्रा मन शांतीसाठी आता मला कोठेही घेऊनच चल मी तयार आहे. मग मी त्यांना विपश्यना ध्यान साधनेची सर्व माहिती व नियम सांगून त्यांचे शिबिर बुक करून घेतले व त्यांच्या मदतीसाठी बेलखेडे नावाचे एक जुने साधक १० दिवसांच्या शिबिरात त्यांची संपूर्ण देखभाल सेवा करण्यासाठी तयार झाले व यशस्वीरित्या त्यांचे शिबिर पूर्ण झाले. पूर्वीचं मनावरच ओझं हे बऱ्यापैकी निघून गेल होतं. ११ व्या दिवशी सकाळी ६.३० वा. शिबिर समाप्त झालं. आजोबांना केंद्र सोडूशीच वाटत नव्हतं. नेत्रहीन आजोबांना अंतर्दृष्टी प्राप्त झाली होती. मनात कृतज्ञतेचा भाव दाटून आला व ते एवढच म्हणाले, बऱ्यापैकी मोकळा झालो रे. खरोखर हजार युद्ध जिंकण्यापेक्षा मनाचं एक युद्ध जिंकणारा योद्धा हा सर्वश्रेष्ठ असतो.

**– दत्ता कोहिनकर (पाटील)**